# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईदर- वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी,मिरारोड पूर्व ता.जि.ठाणे
फोन.नं. ०२२-२९४५१००१
Mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


**प्रेस नोट क्र १०६** **दिनांक- १७/०४/२०२१**

## बनावट नाव व आधारकार्डच्या सहाय्याने ओ.एल.एक्स. वरुन कॅमेरे भाडे तत्वावर घेवुन, त्याची विक्री करुन फसवणुक करणारा गजाआड. २५,०६,०००/- किंमतीचे कॅमेरे व लेन्स माणिकपुर पोलीसांची केले जप्त.

फिर्यादी नामे श्री. कमलप्रित बिरेंद्रसिंग रेखी, वय २८ वर्षे, धंदा- फोटोग्राफी, रा. अरमान बंगलो, प्लॉट नं. १२, मधुबन बंगलो स्किम, बाभोळा नाका, वसई पश्चिम, जि. पालघर यांनी ओ.एल.एक्स. ॲपवर त्यांचा कॅमेरा भाडेतत्वावर देण्यासाठी जहिरात दिली होती. आरोपी नामे योगेश वासुदेव चव्हाण याने त्यास कॅमेरा भाडेतत्वावर पाहिजे असल्याने ओ.एल.एक्स. ॲपवरुन संपर्क साधला व त्याचा मोबाईल नंबर दिला. त्यानुसार आरोपी हा दिनांक २२/०३/२०२१ रोजी फिर्यादी यांच्या राहते परीसरात येवुन कॅमेरा भाडेतत्वावर घेवुन गेला. त्यानंतर आरोपीने कॅमेऱ्याचे भाडे दिले नाही व कॅमेराही परत केला नाही म्हणुन फिर्यादी यांची फसवणुक झाल्याने माणिकपुर पोलीस ठाणे येथे गु.र.क्र. ११५/२०२१ कलम ४२०,४०६,३४ भा.दं.वि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला होता.

सदर गुन्हयातील आरोपी हा वेगवेगळया राज्यांमध्ये भटकंती करुन राहत असल्याने त्यांना शोध घेणे कठीण झाले होते. गुन्हे प्रकटीकरण शाखेने तांत्रिक तपासाच्या आधारे आरोपीची ओळख निष्पन्न केली. आरोपीचा ठावठिकाणा शोधून तो मुंबई येथे आला असता त्यास सापळा रचुन शिताफीने अटक करण्यात आली आहे.

आरोपीचे मुळ नाव सिध्देश सुनिल महाले असे असुन तो ओरीसा येथुन विना कागदपत्राचे सिमकार्ड घेवुन येत व त्या सिम कार्डवरुन ओ.एल.एक्स. वर अकाऊंट बनवुन कॅमेरे भाडेतत्वावर घेत व ओ.एल.एक्स. वरुन ते इतरांना विकत असल्याची कबुली दिली आहे. तसेच कॅमेरा भाडेतत्वावर घेण्यासाठी व विक्रीसाठी तो त्याचे लॅपटॉपवर वेगवेगळे बनावट आधारकार्ड व कॅमेऱ्यांचे बिल बनवुन फसवणुकीसाठी वापरत होता. तसेच आरोपी हा फसवणुक करण्यासाठी सिध्देश सुनिल महाले ऊर्फ कार्तिक तिहारु पटेल ऊर्फ योगेश वासुदेव चव्हाण ऊर्फ नवनीत मोहन नायल ऊर्फ विक्रांत महादेव शेडगे इत्यादी नावांचा वापर करत होता व नमुद नावांचे त्याच्याकडे बनावट आधारकार्ड मिळुन आलेले आहेत.

Scanned with CamScanner

अटक आरोपीने मुंबई / ठाणे / नागपुर / बारामती / पुणे / सुरत, गुजरात / रायपुर, छत्तीसगड, इत्यादि ठिकाणी ओ.एल.एक्स. वरुन विक्री केलेले एकुण १६ कॅमेरे व ९ लेन्स असे अंदाजे रु. २५,०६,०००/- किंमतीचे कॅमेरे व लेन्स जप्त करण्यात आलेले आहेत. तसेच त्याचा मोबाईल व लॅपटॉप जप्त करण्यात आला आहे.

अटक आरोपीकडुन खालील गुन्हे उघड करण्यात आलेले आहेत.

१. गु.र.क्र. ९१२/२०२० कलम ४०६ भा.दं.वि. (अंधेरी पोलीस ठाणे, मुंबई)

२. गु.र.क्र. ४४/२०२१ कलम ४२०,४०६,४६५,४७१ भा.दं.वि.(एन.आर.आय. पोलीस ठाणे, नवीमुंबई)

तसेच अटक आरोपी याने मुंबई / नवीमुंबई / पुणे / रत्नागिरी / सोलापुर / दिल्ली / छत्तीसगड / गोवा / मध्यप्रदेश, इत्यादी ठिकाणी फसवणुक केल्याची कबुली दिलेली आहे.

सदरची कारवाई श्री. संजयकुमार पाटील, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ- २, वसई, श्री. प्रदीप गिरीधर, सहाय्यक पोलीस आयुक्त, वसई विभाग व श्री. भाऊसाहेब आहेर, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, माणिकपूर पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली श्री. सचिन सानप, सहाय्यक पोलीस निरीक्षक, श्रीमती रोहिणी डोके, पोलीस उप निरीक्षक, पो.ह.क्र. २६५/शैलेश पाटिल, पो.ना.क्र. ४८३/धनंजय चौधरी, पो.ना.क्र. १२१७/शामेश चंदनशिवे, पो.शि.क्र. ३०१/किरण आव्हाड, पो.शि.क्र. ६१२/गोपाळ कोळेकर व पो.शि.क्र. २८१/हेमंत कोरडे यांनी केलेली आहे.

Scanned with CamScanner